# महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरीद्वारा उत्पादित करण्यात येणारी जैविक खते व जैव रोग नियंत्रके

| अ.क्र. | तपशील | पिके | विक्री किंमत (दर रु. प्रती किलो) | |
|---|---|---|---|---|
| अ. | **नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू खते** | | **घनरूप (पावडर)** | **द्रवरूप** |
| १. | फुले द्रवरूप रायझोबियम जिवाणू | सोयाबीन गट, चवळी गट, वाटाणा गट | १०० | २५० |
| २. | फुले द्रवरूप ॲझोटोबॅक्टर जिवाणू | ज्वारी, बाजरी, ऊस, गहू, मका, कापूस, सूर्यफूल, मिरची, वांगी, डाळिंब, पेरू आणि आंबा | १०० | २५० |
| ३. | फुले द्रवरूप ॲझोस्पिरिलम जिवाणू | ज्वारी, बाजरी, ऊस, गहू आणि मका | १०० | २५० |
| ४. | फुले द्रवरूप ॲसिटोबॅक्टर जिवाणू | ऊस, साखरबीट आणि रताळे | १०० | २५० |
| ५. | अझोला | भात | ६० | - |
| ब. | **फुले कंपोस्ट कल्चर** | सर्व प्रकारचे सेंद्रिय पदार्थ कुजवने | १०० | - |
| क. | **फुले द्रवरूप स्फुरद जिवाणू** | सर्व प्रकारची तृणधान्ये, गळीतधान्ये, नगदी पिके, चारा पिके, भाजीपाला आणि फळझाडे | १०० | २५० |
| ड. | **फुले द्रवरूप पालाश जिवाणू** | सर्व प्रकारची तृणधान्ये, गळीतधान्ये, भाजीपाला, फळपिके आणि फळझाडे | १०० | २५० |
| इ | **फुले सुपर बायोमिक्स** | सर्व प्रकारची पिके | २५० | ३०० |
| ई | **फुले ट्रायकोडर्मा** | सर्व प्रकारची पिके | २०० | - |

## जैविक खते वापरण्याची पद्धत (प्रमाण)

| पद्धत | जिवाणू | प्रमाण |
|---|---|---|
| **बीजप्रक्रिया** | रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पिरिलम, द्रवरूप स्फुरद जिवाणू, द्रवरूप पालाश जिवाणू | २५ ग्रॅम किंवा २५ मि.ली. प्रति किलो बियाणे |
| **बेणेप्रक्रिया** | ॲसिटोबॅक्टर | १ लिटर प्रति एकर |
| **ठिबक सिंचन** | रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पिरिलम, ॲसिटोबॅक्टर, द्रवरूप स्फुरद जिवाणू, द्रवरूप पालाश जिवाणू | २ किलो किंवा २ लिटर प्रति एकर |
| **जमिनीत देण्यासाठी** | रायझोबियम, ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पिरिलम, ॲसिटोबॅक्टर, द्रवरूप स्फुरद जिवाणू, द्रवरूप पालाश जिवाणू | २ किलो जिवाणू खत ५० किलो शेणखतात मिसळून समप्रमाणात शेतामध्ये टाकावे |
| **पुनर्लागवड** (रोपे बुडविणे) | ॲझोटोबॅक्टर, ॲझोस्पिरिलम, द्रवरूप स्फुरद जिवाणू, द्रवरूप पालाश जिवाणू | ५०० ग्रॅम किंवा ५०० मि.ली. प्रति एकर |

## जैविक खतांच्या उपयुक्तता

१. बियाण्याची उगवण क्षमता वाढवते.
२. झाडांची मुळे जोमदार वाढतात.
३. पिकांची जोमदार वाढ होऊन पिके निरोगी राहतात.
४. पिकांची जमिनीतील अन्नद्रव्ये खेचून घेण्याची क्षमता वाढते.
५. नत्र खतांची २५ ते ५० टक्के बचत होते.
६. पिकांच्या उत्पादनात १५ ते २० टक्के वाढ होते.
७. पर्यावरणास उपयुक्त असल्यामुळे जमिनीचे आरोग्य चांगले राहते.

## फुले कंपोस्ट कल्चर

सर्व प्रकारचे सेंद्रिय पदार्थ कुजवून खतामध्ये रूपांतरित करण्यासाठी उपयुक्त. १ किलो पाकिटातील जिवाणू १ टन सेंद्रिय पदार्थांचे कंपोस्ट करण्यासाठी पुरेसे आहे.

## फुले ट्रायकोडर्मा प्लस

ट्रायकोडर्मा या बुरशीची बिजप्रक्रिया केल्यामुळे उगवणशक्ती वाढवण्यास मदत होते तसेच इतर हानिकारक रोगजन्य बु रशींचा नायनाट होतो . जमिनीतील सेंद्रीय पदार्थ कुजवुन देण्यास मदत करते व त्यामुळे जमिनीचा पोत सुधारतो. ही बुरशी पिकांच्या संपुर्ण वाढी च्या अवस्थेपर्यत संरक्षण करते तसेच ही बुरशी नैसर्गीक घटक असल्यामुळे पर्यावरणावर विपरीत परीणाम होत नाही व माती , पाणी, अन्नघटक इत्यादीचा समावेश होत नाही . त्यामुळे मानव, प्राणी व पक्षी इत्यादीच्या आरोग्यास धोका राहत नाही . ही बुरशी मातीतील सेंद्रीय पदार्थावर वाढत असल्यामुळे रासायनीक बुरशीपेक्षा जास्त काळ प्रभाव टिकुन राहतो व पिकांचे संरक्षण अधिक चांगल्या प्रकारे होते

## ट्रायकोडर्मा वापरण्याची पद्धती :

ट्रायकोडर्मा ही विविध पध्दतीद्वारे वापरता येते. जसे बिज प्रकिया, माती प्रक्रिया, झाडांच्या बुंध्याभोवती द्रावणाद्वारे, पिकांवर फवारणीद्वारे आणी सेंद्रिय खत निर्मितीकरीता.

| अ.क्र | पिके | रोग | वापराची पध्दत | वापरण्याची पध्दत |
|---|---|---|---|---|
| १. | सर्व पिकांसाठी | मर, मुळकुज , खोडकुज, रोपांचा नाश इत्यादी | बिजप्रक्रिया | पेरणीच्या वेळेस ५.६ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर प्रती एक किलो बियाण्यास हाताने चोळावी. |
| २. | सर्व पिकांसाठी | मर, मुळकुज , खोडकुज, रोपांचा नाश इत्यादी | माती प्रक्रिया | १ ते २.५ किलो ट्रायकोडर्मा पावडर २५ ते ३० किलो चांगल्या कुजलेल्या शेणखणात मिसळुन एक एकर क्षेत्रातील मातीत मिसळावी व लगेच पाणी दयावे . |
| ३. | डाळींब व इतर फळझाडे | मर, मुळकुज इत्यादी | द्रावणाद्वारे झाडाच्या बुंध्यापाशी | १० ते १५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर आधिक १ लिटर पाणी यांचे द्रावण करुन झाडाच्या बुंध्यापाशी टाकावे व मातीने झाकुन घ्यावे. |

## मफकृवि., राहुरी द्वारा निर्मित नावीन्यपूर्ण जैव उत्पादन “फुले सुपर बायोमिक्स”

फुले सुपर बायोमिक्स हे उपयुक्त बुरशी व जिवाणू यांचे पावडर आणि द्रवरूप स्वरूपातील प्रायोगिक मिश्रण वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग, मफुकृवि, राहुरी यांनी विकसित केले आहे. फुले सुपर बायोमिक्स हे अतिशय प्रभावी व सक्षम जैविक घटकांवर आधारित आधुनिक फॉर्म्युलेशन आहे.

### फायदे

१. पिकांवर येणारे रोग व किडींचा बंदोबस्त करते.
२. जमिनीतील किडी व रोगांच्या विविध अवस्था नष्ट करते.
३. पिकास अन्नद्रव्ये उपलब्ध होण्यास मदत करते.
४. रासायनिक खतांची बचत होऊन जमिनीचे आरोग्य सुधारते.
५. पिकांची जोमदार वाढ होऊन उत्पादनात वाढ होते.

### वापरण्याची पद्धत

१. आळवणीसाठी: २०० ग्रॅम प्रति १० लिटर किंवा २०० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी.
२. फवारणीसाठी: १०० ग्रॅम प्रति १० लिटर किंवा १०० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
३. ठिबक सिंचन: ४ लिटर फुले सुपर बायोमिक्स २०० लिटर पाण्यातून एक एकर क्षेत्रासाठी ठिबकद्वारे द्यावे.
४. जमिनीतून देण्यासाठी: ४ किलो किंवा ४ लिटर फुले सुपर बायोमिक्स २० किलो शेणखतात मिसळून एक एकर क्षेत्रासाठी जमिनीत समप्रमाणात मिसळून द्यावे.
५. पुनर्लागवड: रोपे बुडविण्यासाठी ५०० ग्रॅम किंवा ५०० मि.ली. प्रति १० लिटर पाणी, प्रति एकर क्षेत्रासाठी वापरावे.
६. बीजप्रक्रिया: १० ग्रॅम किंवा १० मि.ली. प्रति किलो बियाण्यास बीजप्रक्रिया करावी.
७. बेणेप्रक्रिया: बेणेप्रक्रियेसाठी फुले सुपर बायोमिक्सचे ५ टक्के द्रावण तयार करून चार तास बेणे बुडवून नंतर लागवडीसाठी वापरावे.
८. जमिनीतून उद्भवणारे रोग जसे मर रोग, खोडकूज, मुळकूज यांच्या नियंत्रणाकरिता आळवणी तसेच पानांवरील व फळांवरील करपा रोगांच्या नियंत्रणासाठी फवारणी करावी. (१० लिटर पाणी + २०० ग्रॅम फुले सुपर बायोमिक्स)
९. ऊस, आले, हळद, केळी, कापूस व डाळिंब या पिकांमध्ये हुमणी अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी या पिकांच्या खोडाभोवती आळे तयार करून १० लिटर पाणी + २०० ग्रॅम फुले सुपर बायोमिक्सचे द्रावण तयार करून आळवणी करावी.

### उपलब्ध स्वरूप, साठवण क्षमता व सीएफयू संख्या

| तपशील | पावडर स्वरूप | द्रवरूप |
|---|---|---|
| साठवण क्षमता | ६ महिने | १ वर्ष |
| सीएफयू संख्या | १ x १०$^{८}$ | २ x १०$^{८}$ |

### जैविक खते उपलब्ध होणारी केंद्रे

१. महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी
२. बी.एन.एफ योजना, पुणे
३. कृषि महाविद्यालय, कोल्हापूर
४. कृषि संशोधन केंद्र, कसबे दिग्रज
५. विभागिय कृषि संशोधन केंद्र, सोलापूर
६. कृषि महाविद्यालय, धूळे
७. कृषि संशोधन केंद्र, निफाड
८. कृषि महाविद्यालय, काष्टी

### टीप:

१. रु. ५,००० किमतीची जैविक खते खरेदी केल्यास १०% सवलत.
२. रु. १०,००० किमतीची जैविक खते खरेदी केल्यास २०% सवलत.